# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)

महाविद्यालयीन विभाग — एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक (प्रभारी)


क्र/महा. वि./गो.वि./980/२०१५
दिनांक 03/02/२०१५

प्रति,

मा. प्राचार्य/
विभाग प्रमुख मराठी
संलग्नित सर्व महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

विषय :—मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी साहित्य अकादमीकडे पाठपुरवा करण्याबाबत

संदर्भ :— अभिजा—२०१३/प्र.क्र ५९/भाग ४दि. १६ जानेवारी २०१५

मा.महोदय,

उपरोक्त विषयांन्वये आपणांस कळविण्यात येते की मराठी भाषा दिवस दि.२७ फेब्रुवारी २०१५ पूर्वी मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त होण्याच्या अनुषंगाने मा.शिक्षण मंत्री महोदयांचे पत्र प्राप्त झाले असून यापत्रासोबत संलग्न आहे.

साहित्य अकादमीचे मा.अध्यक्ष डॉ.विश्वनाथ प्रसाद तिवारी यांचे नावे 'मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा' याकरिता आग्रही भुमिका घेवून पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्रे, पाकीटे, आणि ई—मेल द्वारे सोबत संलग्नित पत्रातील पत्यावर पाठवून सहाकार्य करावे हि विनंती.

सधन्यवाद !

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक(प्रभारी)
महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

टिप:— दिलेल्या पत्रात टंकलेखनांमध्ये दोष आढळुन आल्यास सदर दोष(चुक) कार्यालयाच्या लक्षात आणुन देवुन सुधारीत प्रत घेवुन जावी


फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४, २२३१०४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

विनोद तावडे
मंत्री

क्रमांक-अभिजा-२०१३/प्र.क्र.५९/भाषा-४
शालेय शिक्षण आणि क्रीडा,
उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण,
मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*

सत्यमेव जयते

दिनांक : **१६ जानेवारी, २०१५**

**विषय :- मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी साहित्य अकादमीकडे पाठपुरावा करण्याबाबत...**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलगुरु चे कार्यालय
आवक क्र. 59 दि. 23/01/15
जावक क्र. 74 दि. 23/01/15

महोदय / महोदया,

सप्रेम नमस्कार !

भारतातील वैशिष्ट्यपूर्ण भाषांना केंद्र शासनाच्या वतीने अभिजात दर्जा बहाल केला जातो. मराठी भाषेला हा अभिजात दर्जा प्राप्त व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग प्रयत्न करीत आहे.

मराठी भाषा दिवस दिनांक २७ फेब्रुवारी,२०१५ पूर्वी मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त व्हावा, असे उद्दिष्ट मी व माझ्या मराठी भाषा विभागाने ठेवले आहे. हे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी आपलेही सहकार्य अपेक्षित आहे. महाराष्ट्र शासनाकडून हा विषय केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडे याआधीच पोहोचलेला आहे. मराठी भाषा विभागाने नेमलेल्या प्रा.रंगनाथ पठारे समितीचा अहवालही साहित्य अकादमी या दिल्लीस्थित संबधित संस्थेकडे पोहोचला आहे.

वरील प्रयत्नांना आपणही हातभार लावावा हे नम्र आवाहन! साहित्य अकादमीचे मा.अध्यक्ष डॉ.विश्वनाथ प्रसाद तिवारी यांचे नावे 'मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा' अशी आग्रही विनंती करणारे विनंती पत्र आपण स्वत: पाठवावे. तसेच आपल्या विद्यापीठातील मराठी भाषा विभागाला अशी पत्रे पाठविण्याची कल्पक मोहीम कार्यान्वित करण्यास सांगावे. त्याचबरोबर आपल्या विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील मराठी भाषा विभागातील विद्यार्थी - प्राध्यापक हेदेखील या मोहिमेत सहभागी होतील, अशी व्यवस्था करावी. कोणत्याही शाखेच्या मराठी भाषाप्रेमी विद्यार्थ्यांनाही आपण सहभागी करुन घेऊ शकता. अधिकाधिक पत्रे साहित्य अकादमीच्या अध्यक्षांपर्यंत पोहोचतील असे उपक्रम कार्यान्वित करावेत. पोस्टकार्ड, आंतर्देशीय पत्रे किंवा पाकीटे अशा कोणत्याही प्रकारे पत्रे पाठवावीत. आपण ई-मेलही पाठवू शकता. पत्राची एक प्रत माझ्या कार्यालयात माहितीसाठी पाठवावी.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर महाराष्ट्रात सार्थ भाषाभिमानाची लाट निर्माण होईल आणि मुख्य म्हणजे भाषाविकासासाठी मोठा निधी उपलब्ध होऊ शकेल. हे सर्व मुद्दे लक्षात घेऊन आपल्या स्वत:च्या पत्रासह जास्तीतजास्त पत्रे साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना पाठवावीत, असे आग्रही आवाहन मी आपणास करत आहे.

सहकार्याबद्दल धन्यवाद !

**सोबत :** मराठी भाषा व अभिजात दर्जा याबाबतचा अधिक तपशील आणि साहित्य अकादमीचा पत्ता व ई-मेल पत्ता जोडला आहे.

आपला

(विनोद तावडे)

**मा.कुलगुरु, डॉ.वि.सा.आईचवार,**
**गोंडवाना विद्यापीठ.**

कार्यालयीन पत्ता : १०८, पहिला मजला, विस्तारित इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
टेलि/फॅक्स क्रमांक : ०२२-२२०२ ९७४२/२२०२ ७१७४ (का.), ०२२-२२८७ १९७०/२२८७ ३५७२ (नि.), ई-मेल : *ministervinodtawde@gmail.com*

## मराठी भाषेला अभिजात दर्जा - अधिक तपशिल

- केंद्र सरकारने आजवर तमिळ, संस्कृत, तेलगु, कन्नड, मल्याळम व ओडिया या सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे.
- या दर्जामुळे त्या भाषेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र सरकारकडून भरीव अनुदान मिळते, भाषेची प्रतिष्ठा वाढते, भाषेच्या श्रेष्ठतेवर राजमान्यतेची मोहोर उमटते, भाषेच्या विकास कार्यास अधिक चालना मिळते.
- मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी सखोल संशोधन व अभ्यास करुन पुरावे एकत्रित करण्यासाठी राज्य शासनाने दिनांक १० जानेवारी, २०१२ रोजी प्रा.रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात मराठी भाषा समितीची स्थापना केली.
- समितीने तयार केलेला मराठी अहवाल दिनांक १२ जुलै, २०१३ रोजी व इंग्रजी अहवाल दिनांक १६ नोव्हेंबर, २०१३ रोजी केंद्र सरकारकडे सादर करण्यात आला.
- अभिजात दर्जा देण्याबाबत केंद्र सरकारचे निकष :
  - भाषेची प्राचीनता.
  - भाषेची मौलिकता आणि सलगता.
  - भाषिक आणि वाङ् मयीन परंपरेचे स्वयंभूषण.
  - प्राचीन भाषा व तिचे अधुनिक रुप यांच्यात पडू शकणाऱ्या खंडासह जोडलेले/असलेले नाते.

  या केंद्र सरकारच्या निकषांनुसार प्रस्ताव सादर केला आहे. हे सर्व निकष आपली मराठी भाषा पूर्ण करते. प्रा.रंगनाथ पठारे समितीचा अहवाल मराठी भाषा विभागाच्या http://marathibhasha.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर "अंतर्गत संस्था" या दुव्यावर (लिंकवर) उपलब्ध आहे.

**************************************************************

**साहित्य अकादमीचा पत्ता :**

**मा.डॉ.विश्वनाथ प्रसाद तिवारी,**

**अध्यक्ष, साहित्य अकादमी,**

**रवींद्र भवन, ३५ फिरोजशाह मार्ग, नवी दिल्ली — ११० ००१.**

ई-मेल : vptiwari378@hotmail.com / secretary@sahitya-akadami.gov.in

संकेतस्थळ : sahitya-akadami.gov.in

----------

रोटा/एच-१११३[३,०००-१-२०१५].